# ७४ व्या घटनादुरुस्तीच्या दृष्टीने महाराष्ट्रात आलेले कायदे

**१३ मार्च २०१२**

तन्मय कानिटकर

GreenEarth

GreenEarth Social Development Consulting Pvt. Ltd.

contactus.greenearth@gmail.com

(शासन व्यवस्थेच्या नीलप्रतीसाठी)

# ७४ व्या घटनादुरुस्तीच्या दृष्टीने महाराष्ट्रात आलेले कायदे

- **१९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४१–** ठराविक काळाने होणाऱ्या निवडणुका, प्रभाग समित्या, मतदारसंघ, अर्थसंकल्पीय अंदाजासाठीच्या काही तरतूदी अशा अनेक मूलभूत गोष्टी या अधिनियामामुळे मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ मध्ये अंतर्भूत झाल्या आहेत. (अधिक खोल माहितीसाठी हा अधिनियम मुळातूनच वाचायला लागेल. इंटरनेटवर हा उपलब्ध नाही.)
- **२००७ चा अधिनियम क्र.३३–** हा अधिनियम म्हणजे माहिती अधिकार कायदा २००५ मध्ये आल्याचा परिणाम असावा. यामध्ये तेरा गोष्टींची एक सूची देण्यात आली आहे ज्या महापालिकेने आपण होऊन प्रकट करणे अपेक्षित आहे. यामध्ये असलेल्या प्रभागाचे आर्थिक व्यवहार वगैरे गोष्टींचा समावेश होतो. ७४ व्या घटना दुरुस्तीला अपेक्षित अशा सत्तेचे विकेंद्रीकरण आणि स्थानिक जनतेला अधिक अधिकार याकडे नेणारा हा अधिनियम आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,१९४९ मध्ये कलम ६०–अ हे या अधिनियामामुळे अंतर्भूत झाले आहे.
- **२००९ चा अधिनियम क्र.२१–** हा अधिनियम म्हणजे क्रांतीकारीच म्हणला पाहिजे. प्रशासनात आणि निर्णय प्रक्रियेत प्रत्यक्ष नागरिकांचा अधिकाधिक सहभाग व्हावा यासाठी क्षेत्र सभा कायदा असे या अधिनियमाला म्हणता येईल. कलम २९–ब ते कलम २९–इ ही कलमे मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमात नव्याने घालण्यात आली आहेत.